अर्थ प्रशासन विभाग
डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

जाक./अप्रवि/अं.से.नि.वे.यो./२८७/२०१८ दिनांक: 05/06/२०१८

## परिपत्रक

सर्व आहरण व संवितरण अधिका–यांना कळविण्यात येते की, नविन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजनेचे आय.यु.एम.एस. (I.U.M.S.) सॉफ्टवेअरमधील D.C.P.S. Module मध्ये **D.C.P.S. Broadsheet Statement** दर्शविण्यात आले आहे. नविन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजनेमधील कर्मचा–यांचे अंशदान व शासनाचे अंशदान यांची माहिती तपासुन/अद्ययावत करून सदर **Broadsheet (Hard Copy)** सांक्षाकित करून या कार्यालयास सादर करणे आवश्यक आहे. सदर माहिती राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजनेची पुढील कार्यवाही करण्याकरीता आवश्यक असल्यामुळे सदर प्रकरणाची पुर्तता त्वरीत होणे गरजेचे आहे.

परंतु असे निदर्शनास आले की, ब–याच आहरण व संवितरण अधिका–यांनी आय.यु.एम.एस. (I.U.M.S.) सॉफ्टवेअरमधील **Employee Module** या सदराखालील **Employee Transfer** मधील आवश्यक माहिती भरलेली नाही. त्यामुळे नविन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजनेमधील कर्मचा–यांचे अंशदान व शासनाचे समतुल्य अंशदानाची माहिती संबंधित **Broadsheet** मध्ये प्रदर्शित होत नसल्यामुळे कर्मचा–यांच्या अंशदानाची अचूक नोंद घेता येत नाही.

करीता सर्व आहरण व संवितरण अधिका–यांना सुचित करण्यात येते की, आपल्या कार्यालयाच्या आस्थापनेवरील यापुर्वी कार्यरत असलेले व सध्या कार्यरत असलेले नविन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजनेमधील अधिकारी/कर्मचा–यांची माहिती सोबत जोडलेल्या प्रपत्र **''अ''** मध्ये भरून ०२ प्रतीत दिनांक १५ जुन, २०१८ पर्यंत या कार्यालयास तात्काळ सादर करण्यात यावे.

नियंत्रक,
डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ,
अकोला

प्रत.:– १)मा. कुलगुरूंचे तांत्रिक सचिव, डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ यांना मा. कुलगुरू महोदय यांचे माहितीकरीता प्रस्तावित.

नियंत्रक
डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ,
अकोला

# प्रपत्र -अ

आहरण व संवितरण अधिका-याचे नांव: ______________________

पदनाम: ______________________

कार्यालयाचे नाव: ______________________

| अ. क्र. | नविन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना लागू असलेल्या अधिकारी व कर्मचा-याचे नाव | कार्यालयात रूजु झाल्याची तारीख | पदनाम | डि.सी.पी.एस. खाते क्र. | दुस-या कार्यालयाच्या आस्थापनेवर स्थानांतरणांमुळे कार्यमुक्त झाल्याची तारीख | स्तंभ ६ मधील आहरण व संवितरण अधिकारी यांचे पदनाम व कार्यालय | स्तंभ ७ मधील कार्यालयात रूजु झाल्याची तारीख | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| | | | | | | | | |

## प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, या कार्यालयाच्या आस्थापनेवर नविन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजनेमधील यापुर्वी कार्यरत असलेले व सध्या कार्यरत असलेल्या अधिकारी/कर्मचा-यांची अचुक माहिती आपल्या कार्यालयास सादर करण्यात येत आहे. करीता प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

आहरण व संवितरण अधिका-याची सही, व पदनाम